महावितरण

महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : १५ ■ जुलै – ऑगस्ट २०२४ ■ पाने : ८

शेतकऱ्यांच्या सेवेमध्ये महावितरणचे योगदान

मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना लागू केली आहे. त्यानुसार राज्यातील साडेसात एचपीपर्यंतच्या कृषी पंप धारक शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज मिळणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी महावितरणवर देण्यात आली आहे. राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना योजनेचा लाभ होणार आहे. इतक्या महत्त्वाच्या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी सरकारने महावितरणवर सोपविल्याबद्दल मी राज्य शासनाचा मनःपूर्वक आभारी आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप

राज्य सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात मागेल त्या शेतकऱ्याला सौर कृषी पंप अशी ही योजना जाहीर केली आहे. मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे की, राज्यात नऊ लाख सौर कृषी पंप देण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. या योजनेत शेतकऱ्यांना वीजनिर्मितीसाठी सौर पॅनेल्स व पाणी उपसण्यासाठीचा पंप असा सर्व संच केवळ दहा टक्के रक्कम भरून मिळतो. अनुसूचित जाती व जमातीच्या शेतकऱ्यांनी केवळ पाच टक्के रक्कम भरायची आहे. उर्वरित रकमेची पूर्तता केंद्र व राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानातून होते.

यामुळे शेतकऱ्यांना कायमस्वरुपी हक्काची सिंचन सुविधा उपलब्ध होते. एकदा सौर कृषी पंप बसविला की सौर पॅनेल्समधून पंचवीस वर्षे वीजनिर्मिती होते. दिवसा वीज निर्मिती आणि दिवसा सिंचन असे असल्याने शेतकऱ्यांची अनेक दशकांची सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठ्याची मागणी पूर्ण होते. मुळात हे पंप वीज पुरवठा यंत्रणेवर अवलंबून नसल्याने वीज पुरवठा कधी होतो अशा कशावरच शेतकरी अवलंबून राहत नाही.

यापूर्वी महावितरणच्या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांना सौर कृषी पंपांचा लाभ झालेला आहे. आता तर राज्य सरकारच्या आदेशानुसार महावितरण लाखो शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषी पंप बसविणार आहे. ज्या शेतकऱ्यांना पारंपरिक कृषी पंप कनेक्शन अद्याप मिळालेले नाही किंवा ज्यांना यापूर्वी सरकारी योजनेत सौर पंपाचा लाभ झालेला नाही असे सर्व शेतकरी या योजनेसाठी पात्र आहेत. शेतकऱ्यांना हक्काची व कायमस्वरुपी सिंचन सुविधा निर्माण करण्यात मदत करणे ही महावितरणसाठी

हितगुज



श्री. लोकेश चंद्र
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

समाधानाची बाब आहे.

शेतकऱ्यांसाठी जगातील सर्वात मोठी योजना

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेच्या माध्यमातून सध्या राज्यात ९ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यात येत आहेत. हा जगातील सर्वात मोठा डिस्ट्रिब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प आहे. सौर ऊर्जेचा वापर करून वीज तयार करायची व त्याद्वारे कृषी फीडर्स चालवून शेतीला दिवसा वीज पुरवठा करायचा अशी ही योजना आहे.

शेतीला दिवसा भरवशाचा वीज पुरवठा व्हावा ही शेतकऱ्यांची मागणी आहे तर शेतीला स्वस्तात वीज देण्यासाठी उद्योगांवर लागू केलेला क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करावा अशी उद्योग क्षेत्राची मागणी आहे. या समस्येवर उपाय म्हणून तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जून २०१७ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली. त्यातून २३४ कृषी वाहिन्यांवरील एक लाख कृषी ग्राहकांना आतापर्यंत दिवसा आठ तास वीज पुरवठा सुरू झाला. त्या योजनेतील अडचणी ध्यानात घेऊन व्यापक अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० एप्रिल २०२३ मध्ये मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. त्यानंतर प्रकल्पांसाठी सार्वजनिक जमिनी शोधून उपलब्ध करणे, प्रकल्प उभारणीची टेंडर्स काढणे, आराखडे निश्चित करणे, वाढीव ऊर्जानिर्मितीच्या दृष्टीने वीज जाळ्यात सुधारणा करणे आणि प्रकल्प उभारणीसाठी कार्यादेश देणे हे काम युद्ध पातळीवर झाले. योजना सुरू झाल्यापासून अकरा महिन्यात नऊ हजार मेगावॅट वीजनिर्मितीसाठी संबंधित कंपन्यांना कार्यादेश देण्याची कामगिरी घडली.

संबंधित कंपन्यांकडून सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारले जात असताना महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून संपूर्ण सहकार्य अपेक्षित आहे. जमिनी भाड्याने देणे, जमिनीचे सीमांकन करणे, सौर ऊर्जेतून निर्माण झालेली वीज सब स्टेशनपर्यंत वाहून नेण्यासाठीच्या वाहिन्या उभारण्यातील अडचणी दूर करणे अशा सर्व कामांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय मदत करणे आवश्यक आहे. विकासकांनी विशिष्ट कालमर्यादेत वीज निर्माण करून महावितरणला पुरविणे अपेक्षित असल्याने तांत्रिक मंजुऱ्यांचे अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच याविषयी नमुना गणनाही संदर्भासाठी दिलेली आहे. सदर तांत्रिक मंजुऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ देणे आवश्यक आहे. गेल्या वर्षभरात ज्या प्रकारे सर्वांनी युद्धपातळीवर काम केले त्याच पद्धतीने आता प्रत्यक्ष प्रकल्प उभारून महावितरणला वीज मिळण्याच्या शेवटच्या टप्प्यातही आपल्याला सक्रियतेने काम करायचे आहे. महावितरणच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आपण साकारत आहोत. तो पूर्ण होईपर्यंत आपण असेच उत्साहाने काम करू.

या योजनेमध्ये खासगी क्षेत्राकडून ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून ३० हजार रोजगारनिर्मिती होत आहे. या प्रकल्पांचे काम सुरू आहे. सप्टेंबर महिन्यापासून या योजनेतून टप्प्या टप्प्याने वीजनिर्मिती सुरू होईल व शेतकऱ्यांना लाभ होईल. राज्यातील ५२९३ कृषी फीडर्सवरील २१,१६,२४५ कृषी ग्राहकांना या योजनेमुळे दिवसा वीज पुरवठा होणार आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चे धोरण निश्चिती व अंमलबजावणी यामध्ये राज्याचा ऊर्जा विभाग आणि महावितरणने समन्वयाने काम केले आहे. जमीन उपलब्ध करण्यासाठी महसूल खात्याची मदत झाली. मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचा दृढ निर्धार तसेच सरकारी यंत्रणा व महावितरणचा समन्वय यामुळे राज्यामध्ये संपूर्ण देशासाठी पथदर्शी असा जगातील सर्वात मोठा डिस्ट्रिब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या सेवेमध्ये महावितरणचे हे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. ■

वीजबिल वसुलीसह ग्राहकाभिमुख सेवा द्या : सहव्यवस्थापकीय संचालक श्री. गुप्ता यांचे निर्देश



▸▸आढावा बैठकीत बोलताना सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता समवेत मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे, अधीक्षक अभियंता श्री. प्रेमसिंग राजपूत

कंपनीच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिलांची नियमित वसुली करण्यावर भर देऊन प्राधान्याने ग्राहकसेवा द्या. वीजबिल वसुलीच्या कार्यक्षमतेचे प्रमाण कमी झालेल्या भागातील सर्व अधिकाऱ्यांनी वीजबिल वसुलीवर लक्ष केंद्रित करावे.अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असे निर्देश सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांनी बीड मंडलाच्या आढावा बैठकीत दिले. श्री.गुप्ता यांनी पैसे भरून प्रलंबित वीज जोडण्या त्वरित निकाली काढण्याचे निर्देश दिले. आष्टी, पाटोदा, बीड ग्रामीण, माजलगाव व तेलगाव या क्षेत्रातील वीजबिल वसुलीबाबत चिंता व्यक्त केली. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना व सौर कृषीपंपाच्या कुसूम योजनेचा आढावा घेतला. बैठकीस मंडलातील सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते तसेच मानव संसाधन व लेखा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ■

सामान्य आदेश मॉड्यूलबाबत प्रशिक्षण



▸▸ छत्रपती संभाजीनगर येथे ऑनलाइन सामान्य आदेश मॉड्यूलबाबतच्या प्रशिक्षण वर्गात महाव्यवस्थापक (मासं) श्री. राजेंद्र पांडे व समवेत अधिकारी-कर्मचारी.

सांघिक कार्यालयातील महाव्यवस्थापक (मासं) श्री. राजेंद्र पांडे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच नवीन विकसित एचजीबी मॉड्यूल, ऑनलाइन सामान्य आदेश ७४ / १११ (क) या संदर्भात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रादेशिक कार्यालयांतर्गत छत्रपती संभाजीनगर, लातूर व नांदेड परिमंडल कार्यालयातील मानव संसाधन विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री. पांडे यांनी सॅप प्रणालीद्वारे अदा करण्यात येणारे वेतन, बायेमेट्रिक हजेरी या व्यतिरिक्त मानव संसाधन विभागाशी निगडीत विविध विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी कु. ज्योती पन्हाळे, श्री. पुरुषोत्तम निंबाळकर यांनी एचजीबीमधील चालू प्रकरणांचे प्रात्यक्षिक स्वरूपात आदेश निर्गमित करेपर्यंत सर्व टप्पे दाखविले. ■

कोकणातील प्रतिकूल परिस्थितीतील कार्यानुभव बळ देणारा :

कनिष्ठ अभियंता श्रीमती स्वप्नाली थोरात यांच्या शब्दात...



'नोकरीच्या सुरुवातीच्या काळातच कोकणात आलेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे उद्धवस्त झालेली वीज यंत्रणा उभारताना जे अनुभव आले आणि शिकायला मिळाले, त्या शिदोरीवरच आपण कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत काम करु शकतो हा आत्मविश्वास माझ्यात निर्माण झाला. या अनुभवाच्या जोरावरच मी पाबळ ता. शिरूर शाखेतही चांगले काम करु शकत आहे. २०१९ साली सरळ सेवा भरतीमधून मला महावितरणमध्ये कनिष्ठ अभियंता पदी काम करण्याची संधी मिळाली. पहिली पदस्थापना मिळाली ती थेट कोकणातील कुडाळ मंडलाच्या पाट शाखेत. एकीकडे नोकरी मिळाल्याचा आनंद होताच पण गावापासून ४०० किलोमीटर अंतरावर नोकरीला जायची धाकधूकही होती. हे आव्हान स्विकारले तोच कोकणात तौक्ते चक्रीवादळाने किनारपट्टीला धडक दिली. तेथील विद्युत यंत्रणा अक्षरशः कोलमडून पडली. परंतु, कोकणी माणसं प्रतिकूल परिस्थितीतही अत्यंत चिवटपणे काम करतात. त्यांच्यातील हुरुप पाहून माझाही आत्मविश्वास वाढायचा. जनमित्र सहकाऱ्यांच्या साथीने आम्ही संकटावर मात केली. पाच वर्षानंतर मला स्वतःच्या जिल्ह्यात बदली मिळाली. जुलै २०२३ मध्ये पाबळ (ता. शिरुर) शाखेत कनिष्ठ अभियंता पदावर मी रुजू झाले. माझे मूळ गाव आमदाबाद शिरुर तालुक्यातीलच असल्याने मला या भागाची माहिती होती. अकरा महिन्यात पाबळ शाखेच्या अकृषी वीजबिलाची मागणी (डिमांड) ४०.७६ लाखांवरुन ५५ लाखावर नेली. ४१९ नवीन वीजजोडण्या दिल्या. मार्चअखेर १२७ टक्के वसूली करुन थकबाकी साडेपाच लाखांनी कमी केली. या कामी मला सर्व सहकारी जनमित्र व वरिष्ठांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. कोकणातील कामामुळेच मला हे बळ मिळाले !' ■

चुनाभट्टी, सायन येथील कर्मचारी वसाहतीत वृक्षारोपण



▸▸ वृक्षारोपण करताना कर्मचारी व अधिकारी

चुनाभट्टी, सायन येथील कर्मचारी वसाहतीत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, नायगाव, मुंबई व महावितरण यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

या वृक्षारोपणात कडुनिंब, कडीपत्ता, जास्वंदी, आंबा आदी वृक्षांची रोपे लावण्यात आले. यावेळी कामगार कल्याण मंडळाचे केंद्र संचालक श्री. अनिल लोखंडे, महिला केंद्र सहाय्यिका श्रीमती मृण्मयी मोडक तसेच महावितरणचे कर्मचारी सर्वश्री प्रवीण शिंदे, जगदीश कार, नितीन लोखंडे, अंबादास गायकवाड, प्रभू मेश्राम, सुदेश जाधव, पंढरी ठाकरे, नंदलाल खरे व श्रीमती ज्योती वरोरकर यांची उपस्थिती होती. ■

सौर ऊर्जेसाठी महावितरण सन्मानित





▸▸ केंद्रीय मंत्री मा.ना.श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक आणि संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे नवीकरणीय ऊर्जा रत्न पुरस्काराने सन्मानित.

ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनच्या वतीने सौर ऊर्जा क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरीसाठी महावितरणला सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारांचे वितरण केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री मा.ना. श्री.नितीन गडकरी यांच्या हस्ते नुकतेच नागपूर येथे संपन्न झाले.

राज्यातील विविध योजनांना चालना देण्यासाठी स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांना, पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजनेत किमान कालावधीत १४०० पेक्षा अधिक विक्रेते संलग्न केल्याबद्दल संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांना आणि कार्यकारी संचालक (पायाभूत आराखडा) श्री. धनंजय औंढेकर यांना प्रधानमंत्री सूर्यघर योजनेच्या जलद अंमलबजावणीसाठी 'नवीकरणीय ऊर्जा रत्न पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके यांना नागपूर जिल्ह्यात राज्यातील एकूण पैकी २५ टक्के सौरसंच उभारणीसाठी व सौर ऊर्जा उपकरणे विक्रेत्यांना उत्कृष्ट सहकार्याबद्दल कार्यकारी अभियंता श्री. शरद बंड, सहाय्यक अभियंता इक्बाल खुर्शीद यांना नवीकरणीय ऊर्जा रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र आणि संचालक (संचालन तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांनी अभिनंदन केले आहे. ■

'सूर्याकॉन' परिषदेत चार पुरस्कार



▸▸ पुणे येथे आयोजित 'सूर्याकॉन' परिषदेमध्ये महावितरणसह पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व डॉ. संतोष पाटणी यांना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

देशभरातील सौर ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ, विविध कंपन्या व प्रतिनिधींची 'सूर्याकॉन' परिषद पुणे येथे नुकतीच आयोजित करण्यात आली. यात 'मोस्ट प्रोग्रेसिव्ह युटीलिटी ऑफ द इअर'चा पुरस्कार महावितरण कंपनीला, 'पॉलिसी एक्सलेंस अवार्ड फॉर मोस्ट इफेक्टिव्ह इंप्लिमेंटेशन ऑफ सोलार पॉलीसीज'चा पुरस्कार महावितरणच्या पुणे परिमंडलास तसेच 'एक्सलेंस इन ग्रीव्हन्स हॅण्डलिंग ऑफ सोलार कन्झूमर्स ॲण्ड व्हेंडर्स'चा पुरस्कार मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांना आणि 'एक्सलेंस इन पॉलीसी अवेअरनेस टू सोलार कन्झूमर्स ॲण्ड व्हेंडर्स'चा पुरस्कार उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांना प्रदान करण्यात आला. ■

छत्रपती संभाजीनगर परिमंडलात कार्यशाळा



▸▸ कार्यशाळेत बोलताना मुख्य अभियंता श्री. पवनकुमार कछोट. मंचावर (डावीकडून) सर्वश्री सुनील पावडे, दीपक सोनोने, लक्ष्मीकांत राजेल्ली, भूषण पहुरकर, वेंकटेश पेन्सलवार आदी.

विद्युत कायदा-२००३ मधील विविध कलमांन्वये वीजचोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येते. या कायद्यातील विविध तरतुदी, ग्राहक मंच व न्यायालयात प्रकरणे योग्य पध्दतीने दाखल करण्याच्या प्रक्रियेबाबत अभियंते व लेखा कर्मचाऱ्यांसाठी पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न झाली. सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता यांनी समारोप प्रसंगी सांगितले की, वीजचोरीच्या प्रकरणात विद्युत कायद्यातील सर्व कलमे व नियमांचा अभ्यास करुन ती न्यायालयात दाखल करावेत. मुख्य अभियंता श्री. पवनकुमार कछोट उद्घाटन प्रसंगी म्हणाले की, वीजचोरीविरुध्द कलम १२६, १३५ नुसार कारवाई प्रकरणांत त्रूटी राहिल्याने ही प्रकरणे ग्राहक मंच व न्यायालयात टिकत नाहीत. त्यामुळे ती प्रकरणे करताना योग्य प्रक्रियेचा अवलंब करावा. अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. आकाश तायडे, ग्राहक मंचाचे कार्यकारी अभियंता श्री.मकरंद कुलकर्णी, कनिष्ठ विधी अधिकारी श्री. सुनील पावडे यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. वेंकटेश पेन्सलवार यांनी केले. उपकार्यकारी अभियंता श्री. दीपक गडलिंग व हयात खान यांनी स्वागत केले. जनसंपर्क अधिकारी श्री. ज्ञानेश्वर आर्दड यांनी सूत्रसंचालन केले. ■

कसदार अभिनयाने.....नागपुरातील रसिकांची मने जिंकली.....!

'डबल गेम' प्रथम तर 'नथिंग टू से' द्वितीय





▸▸ विजेत्या नाट्यसंघास चषक प्रदान करताना संचालक (संचालन तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर समवेत मान्यवर

नागपूर येथे संपन्न झालेल्या महावितरणच्या आंतर प्रादेशिक विभाग राज्य नाट्यस्पर्धेत कोकण विभागाने सादर केलेल्या 'डबल गेम' नाटकाने सांघिक नाट्यनिर्मिती प्रथम क्रमांकासह वैयक्तिक गटात पाच पारितोषिके पटकावली. नागपूर विभागाच्या 'नथिंग़ टू से' या नाटकृतीस द्वितीय पारितोषिक मिळाले. संचालक (संचालन तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. वसंतराव देशपांडे सभागृहात दोन दिवशीय नाट्यस्पर्धा झाली. या स्पर्धेत पुणे विभागाने 'ती फुलराणी', छत्रपती संभाजी नगर विभागाने 'उत्तरदायित्व' ही नाटके सादर केली.

यावेळी बोलतांना श्री. अरविंद भादिकर यांनी नाट्यस्पर्धेत मिळालेली ऊर्जा सर्वांनी आपल्या दैनंदिन कार्यालयीन कामात उपयोगात आणून व्यवस्थापनाची अपेक्षा पुर्ण करावी, असे आवाहन केले. नाट्यस्पर्धेतून कलेच्या संवर्धनासोबत वीज कर्मचाऱ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळून आपसातील संवाद, सहभाग व सांघिक भावना वाढीस लागते. या स्पर्धेत सहभागी होऊन सर्वांनी दर्जेदार कला सादर केली. रसिकांना मनमुराद आनंद दिला. यातून तुम्ही सर्वजण विजयी ठरले आहात. स्पर्धेत सादर झालेल्या दर्जेदार नाट्य कृतींसाठी बॅकस्टेज आर्टीस्टसह सर्व कलावंताचे त्यांनी विशेष कौतुक केले. उत्कृष्ट नियोजनाबाबत नागपूर परिमंडलाचे कौतुक केले.

या नाट्यस्पर्धेचे यजमान तथा नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.दिलीप दोडके म्हणाले की, माणसाच्या अंगात जन्मत: ६४ कला असतात त्यात आता ६५ व्या कलेची जोड मिळाली आहे. ती म्हणजे, कलेस व कलाकारांना दाद देण्याची कला होय. प्रत्येकाने ही कला आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी तत्कालीन मुख्य अभियंता श्री. परेश भागवत (सांघिक कार्यालय), मुख्य अभियंता श्री. सुहास रंगारी (अकोला), श्रीमती पुष्पा चव्हाण (गोंदिया), श्री. ज्ञानेश कुलकर्णी (अमरावती), श्री. स्वप्निल काटकर (कोल्हापूर), श्री. पवनकुमार कछोट (छत्रपती संभाजी नगर), श्री. हरिष गजबे (चंद्रपूर), श्रीमती कल्पना पाटील (रत्नागिरी), मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार, परिक्षक श्री. प्रभाकर आंबोने, श्री. विनोद तुंबडे, श्रीमती मंजुश्री डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन श्रीमती रेणुका देशकर, प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मधुसुदन मराठे यांनी केले.

पारितोषिके व विजेते

सर्वोत्कृष्ट निर्मिती :	(प्रथम) डबल गेम, (द्वितीय) – नथिंग टू से
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन :	(प्रथम) श्री. राजीव पुणेकर (डबल गेम), (द्वितीय) – श्री. संजय पूरकर (नथिंग टू से)
अभिनय पुरूष :	(प्रथम) श्री. दुर्गेश जगताप (डबल गेम), (द्वितीय) – श्री. प्रसाद दिवाण (ती फुलराणी)
अभिनय स्त्री :	(प्रथम) श्रीमती श्रद्धा मुळ्ये (डबल गेम), (द्वितीय) – श्रीमती श्वेता सांगलीकर (ती फुलराणी)
नेपथ्य :	(प्रथम) श्री. संजय कांबळे (ती फुलराणी), (द्वितीय) – श्री. राजेंद्र जाधव (डबल गेम)
प्रकाश योजना :	(प्रथम) श्री. किशोर दाभेकर (नथिंग टू से), (द्वितीय) – श्री. सुनील शिंदे (उत्तरदायित्व)
संगीत :	(प्रथम) – श्री. अनिल राजपूत (उत्तरदायित्व), (द्वितीय) – श्री. दीपक भोसले (ती फुलराणी)
रंगभूषा व वेशभूषा :	(प्रथम) श्री. सतीश बनकर (ती फुलराणी), (द्वितीय) – श्रीमती राजश्री मोरे (डबल गेम)
बालकलाकार :	कु. राजेश्री शिंदे (उत्तरदायित्व)
उत्तेजनार्थ :	श्री. मंगेश कांबळे (ती फुलराणी), श्रीमती पल्लवी गायकवाड (उत्तरदायित्व), श्रीमती अनुराधा गोखले (डबल गेम) आणि कु. गौरी पूरकर (नथिंग टू से) ■



▸▸ श्री. प्रकाश राऊत

श्री. प्रकाश राऊत यांचा 'सायबर सेक्युरिटी' शिक्षणक्रम पूर्ण

भारत सरकारच्या विद्युत मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या 'नॅशनल पॉवर ट्रेनिंग इन्स्टीट्युट' यांच्याकडून घेण्यात येणारा 'सायबर सेक्युरिटी' विषयातील पदव्युत्तर पदविका शिक्षणक्रम श्री. प्रकाश राऊत यांनी नुकताच पूर्ण केला आहे. वीज क्षेत्रात होऊ शकणारे सायबर हल्ले, वीज देयकाबाबत होणारी ग्राहकांची फसवणूक हे रोखण्यासाठी करण्यात येणारे उपाय तसेच वीज ग्राहकांच्या दृष्टीने सायबर सेक्युरिटीबाबत जागृती यांची माहिती व प्रशिक्षण या शिक्षणक्रमात देण्यात आले. विद्युत मंत्रालयाचा हा शिक्षणक्रम पूर्ण करणारे श्री. राऊत हे महावितरणमधील पहिले अधिकारी ठरले आहेत. ते सांघिक कार्यालय येथे देयके व महसूल विभागात अधीक्षक अभियंता पदी कार्यरत आहेत. ■

अनुभवाची खाण अन् महावितरणला ऊर्जा

नूतन कार्यकारी संचालकांचे अभिनंदन!




श्री. सुनील रंगनाथ पावडे
कार्यकारी संचालक-४ (प्रकल्प)
एम.ई. पीजीडी-एचआरएम
कनिष्ठ अभियंता
३१ मार्च १९९४
महाड- पेण रुजू
३० वर्षे सेवेत
२०१७ पासून मुख्य अभियंता पदी नाशिक व बारामती परिमंडलात कामकाज



श्री. दिनेश हनुमानदास अग्रवाल
कार्यकारी संचालक-१ (वाणिज्य)
बी.ई. एम.बी.ए.
कनिष्ठ अभियंता
०४ एप्रिल १९९४
देगलूर-नांदेड रुजू
३० वर्षे सेवेत
२०१९ पासून मुख्य अभियंता पदी कल्याण परिमंडल व सांघिक कार्यालयात कामकाज



श्रीमती स्वाती पराग व्यवहारे
कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)
बी.कॉम.
आय.सी.डब्लू.ए.
व्यवस्थापक
१५ जुन १९९४ सांघिक कार्यालय रुजू
३० वर्षे सेवेत
२०१७ पासून मुख्य महाव्यवस्थापक, कार्यकारी संचालक (वित्त व लेखा) पदी कामकाज



श्री. परेश रामचंद्र भागवत
प्रादेशिक संचालक, नागपूर
बी.ई. एम.बी.ए.
कनिष्ठ अभियंता
११ ऑगस्ट १९९७
कट्टा-सिंधुदुर्ग रुजू
२७ वर्षे सेवेत
२०१८ पासून मुख्य अभियंता पदी सांघिक कार्यालय व कोल्हापूर परिमंडलात कामकाज



श्री. धनंजय रामभाऊ औंढेकर
कार्यकारी संचालक-३ (पायाभूत आराखडा)
बी.ई. एम.बी.ए.
कनिष्ठ अभियंता
३१ जुलै १९९७
माजलगाव, बीड रुजू
२७ वर्षे सेवेत
२०१९ पासून मुख्य अभियंता पदी सांघिक कार्यालय व कल्याण परिमंडलात कामकाज



श्री. भुजंग बळीराम खंदारे
प्रादेशिक संचालक, पुणे
बी.ई. एम.बी.ए.
कनिष्ठ अभियंता
९ जुलै १९९९
चाळीसगाव शहर विभाग रुजू
२५ वर्षे सेवेत
२०१८ पासून मुख्य अभियंता पदी सांघिक कार्यालय व छत्रपती संभाजीनगर परिमंडलात कामकाज



श्री. दत्तात्रय विष्णू पडळकर
कार्यकारी संचालक-२ (वितरण)
बी.ई. इलेक्ट्रॉनिक्स, एनर्जी ऑडिटर
कनिष्ठ अभियंता
२४ जून २००३ सांघिक कार्यालय रुजू
२१ वर्षे सेवेत
२०१९ पासून मुख्य अभियंता पदी नांदेड व अकोला परिमंडलात कामकाज

लोकाभिमुख कारभारासाठी नीतिमत्ता आवश्यक : प्रादेशिक संचालक श्री. परेश भागवत



▸▸ नागपूर प्रादेशिक विभाग आढावा बैठक

प्रत्येकाने नीतिमत्तेने कार्य पार पाडल्यास महावितरणचा कारभार अधिक लोकाभिमुख होईल, असा विश्वास नागपूरचे नूतन प्रादेशिक संचालक श्री. परेश भागवत यांनी व्यक्त केला. नागपूर प्रादेशिक विभागातील अकोला, अमरावती, नागपूर, गोंदिया आणि चंद्रपूर परिमंडलाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीत श्री. भागवत यांनी पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी शुल्काचा भरणा केल्यानंतर तात्काळ नवीन वीजजोडणी द्यावी, असे निर्देश दिले. 'इज ऑफ लिव्हिंग' नुसार ग्राहकांना गतीमान सेवा द्यावी. ग्राहक तक्रारीचे कालमर्यादेत निराकरण करण्यासाठी स्थानिक यंत्रणेने अधिक संवेदनशील व सजग रहावे. महावितरणचा आर्थिक डोलारा सांभाळण्यासाठी दरमहा शंभर टक्के वीजबिल वसुली होणे गरजेचे आहे. यासाठी योग्य नियोजन करून वीजबिल वसुलीस प्राधान्य द्यावे,अशा स्पष्ट सुचना श्री.भागवत यांनी दिल्या. मंडलनिहाय कामकाजाचा आढावा घेतला. बैठकीस मुख्य अभियंते सर्वश्री सुहास रंगारी, दिलीप दोडके, ज्ञानेश कुलकर्णी, हरिष गजबे, श्रीमती पुष्पा चव्हाण यांच्यासह सर्व अधीक्षक अभियंते, वित्त व लेखा विभागातील अधिकारी उपस्थित होते. ■

प्रशिक्षण व सुरक्षा केंद्र एकलहरे येथे 'प्रशिक्षकांचे प्रशिक्षण'



▸▸ प्रशिक्षण समारोपप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक श्री. दत्तात्रय बनसोडे यांच्या समवेत अधिकारी व प्रशिक्षणार्थी.

महावितरणच्या राज्यभरात असलेल्या एकूण २५ लघु प्रशिक्षण केंद्रांच्या समन्वयकांसाठी आयोजित **प्रशिक्षकांचे प्रशिक्षण** ही दोन दिवशीय कार्यशाळा प्रशिक्षण व सुरक्षा केंद्र, एकलहरे येथे पार पडली. याद्वारे प्रशिक्षकांच्या क्षमतावृद्धीसह अनुषंगिक विषयावर प्रशिक्षण दिले. प्रशिक्षकांचे मनोबल वाढविण्यासाठी नियमितपणे असे प्रशिक्षण व्हावे, असे प्रतिपादन समारोपप्रसंगी प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. दत्तात्रय बनसोडे यांनी केले.

याप्रसंगी प्रभारी सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. बन्सीलाल पवार, कार्यकारी अभियंते सर्वश्री. नरेंद्र सोनवणे, आर. सी. पाटील , बी. पी. पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. ए. पी. गायकवाड उपस्थित होते. कार्यशाळेसाठी प्रशिक्षक म्हणून डॉ. संतोष पटणी, डॉ. जितेंद्र राठोड, श्री. दीपक दवे, श्री. नितीन आव्हाड आणि डॉ. चिदानंद फाळके यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थी लघु प्रशिक्षण केंद्र समन्वयकांच्या हस्ते एकलहरे प्रशिक्षण केंद्राच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. ■

५० वर्षे जुन्या देवळा उपकेंद्राला आयएसओ मानांकन



▸▸ आयएसओ मानांकन प्रमाणपत्र कार्यक्रम

देवळा उपविभागातील ५० वर्ष जुने असलेल्या विद्युत उपकेंद्राला अधिकारी व कर्मचारी यांनी गेली सहा महिने दैनंदिन कामकाजात वेळ काढून नामांकन प्राप्त करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले, असे प्रतिपादन मालेगाव मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. जगदीश इंगळे यांनी केले. नाशिक परिमंडल अंतर्गत असलेल्या मालेगाव मंडलातील ३३/११ के.व्ही. देवळा उपकेंद्र ९००१:२०१५ नामांकन प्राप्त झाल्याच्या निमित्ताने आयोजित कौतुक सोहळ्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी मालेगाव मंडलातील कार्यकारी अभियंता(प्रशासन) श्री. शैलेश जैन, उपकार्यकारी अभियंता श्री. बंकट सुरवसे, श्री. नितीन अंबाडकर, श्री. लक्ष्मीकांत चव्हाण, यंत्रचालक श्री. बाळा देवरे, श्री. तुषार सोनवणे, श्री. निखील थोरात, जनमित्र श्री. गुलाब आहेर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सहाय्यक अभियंता श्री. जितेंद्र देवरे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. कैलास शिवदे, आभार यंत्रचालक श्री .हिरामण पवार यांनी मानले. ■

पीएम सूर्यघर योजनेच्या प्रचारासाठी वारीमध्ये कॅम्प



ग्राहकांनी पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेमध्ये सहभाग नोंदवून त्यांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी सहव्यवस्थापकीय संचालक श्री.राहुल गुप्ता यांनी ग्राहकांच्या दारी जाऊन योजनेचा प्रचार करण्याची संकल्पना मांडली. त्यानुसार मुख्य अभियंता श्री. पवनकुमार कछोट यांच्या मार्गदर्शनाखाली वाळूज शहर उपविभागातर्फे छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील पंढरपूर येथील आषाढी एकादशी वारीमध्ये कॅम्प लावून जनजागृती करण्यात आली.

पंढरपूरची वारी ही जिल्ह्यातील सर्वात मोठी वारी आहे. या कॅम्पला चांगला प्रतिसाद मिळाला. कॅम्पमध्ये अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. प्रविण जोशी यांनी माहिती दिली. यशस्वीतेसाठी सहाय्यक अभियंता श्रीमती सरिता स्वामी विठाळकर, सर्वश्री रवी मिरगणे, विक्रांत खाडे, जनमित्र सर्वश्री भागवत गव्हाणे, नवनाथ संबारे, श्रीमती वृषाली डिक्कर यांनी परिश्रम घेतले. ■

डॉ. वंजारी यांना नाट्यस्पर्धेत पारितोषिक

कोकण आंतर प्रादेशिक नाट्यस्पर्धेत भांडुप परिमंडलाच्या 'द रेन इन द डार्क' या नाटकातील अभिनयासाठी डॉ. संदीप वंजारी यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. ■

अभिनंदन



प्रणव भारती याने एमएस्सी इन ॲडव्हान्सड इलेक्ट्रिकल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग मॅनेजमेंट ची युकेतील लिसेस्टर विद्यापीठाची पदवी प्राप्त केली आहे. कोल्हापूर परिमंडलातील उपव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. सुहास भारती यांचे ते सुपुत्र आहेत.



फुलचंद गुट्टे याने अमेरिकेतील दक्षिण फ्लोरिडा विद्यापीठातून इलेक्ट्रिकल्स तर हॅरिसबर्ग विद्यापीठातून व्यक्तिगत प्रकल्प व्यवस्थापन या दोन विषयात एम.एस. पदवी मिळविली आहे. परळी विभागात उच्चस्तर लिपीक (लेखा) पदी कार्यरत श्री. दत्तात्रय गुट्टे यांचे ते सुपुत्र आहेत.

दहावीतील गुणवंत



कु. जुई लक्ष्मीकांत खाटू
गुण ९०.८० टक्के
पालक : श्रीमती स्मृती लक्ष्मीकांत खाटू
सहाय्यक लेखापाल,
वाशी मंडळ,
भांडूप नागरी परिमंडल.



कु. प्रांजली सुनील काकडे
गुण ९४.८० टक्के
पालक : श्री. सुनील काकडे
मुख्य अभियंता,
भांडूप नागरी परिमंडल.



कु. आर्या शरद पवार
गुण ८७.७० टक्के
पालक : श्रीमती आशा शरद पवार
उच्चस्तर लिपिक,
भ.नि.नि. विभाग
धारावी, माटुंगा

अधीक्षक अभियंते बदली

अधिकारी यांचे नाव	पदस्थापना ठिकाण
श्री. अंकुर हरी कावळे	वितरण कक्ष नियोजन, सांघिक कार्यालय
श्री. मंदार अनंत अत्रे	डीडीयुजीजेवाय, सांघिक कार्यालय
श्री. प्रकाश शामराव राऊत	देयके व महसूल, सांघिक कार्यालय
श्री. विजयानंद संपतराव काळे	पुणे प्रादेशिक कार्यालय
श्री. मधुकर दत्तात्रय घुमे	संचालन, नागपूर प्रादेशिक कार्यालय
श्री. अशोक सीतारामजी साळुंके	सिंधुदुर्ग मंडल
श्री. संजय शकर पाटील	वाशी मंडल
श्री. प्रवीण मारोतराव दरोली	यवतमाळ मंडल


अधिकारी यांचे नाव	पदस्थापना ठिकाण
श्री. दीपक प्रल्हाद देवहाते	अमरावती मंडल
श्री. प्रकाश सोनेराव खांडेकर	गडचिरोली मंडल
श्री. मोहन शिवाजी काळोगे	कल्याण स्थापत्य मंडल
श्री. विजय लक्ष्मण मोरे	छत्रपती संभाजीनगर, स्थापत्य मंडल
श्री. चंद्रशेखर उत्तमराव पाटील	पायाभूत आराखडा, बारामती परिमंडल
श्रीमती पुनम आशिष रोकडे	पायाभूत आराखडा, कोल्हापूर परिमंडल
श्री. विनोद चंद्रकांत पाटील	पा. आ. प्रादेशिक कार्यालय, छ. संभाजीनगर
श्री. अनिल सदाशिव घोगरे	पायाभूत आराखडा, पुणे परिमंडल
श्री. रमेश शंकरराव सानप	पायाभूत आराखडा, चंद्रपूर परिमंडल

नूतन अधीक्षक अभियंता यांचे अभिनंदन!


श्री. प्रेमसिंग मच्छिंद्रसिंग राजपूत
बीड मंडल


श्री. सिंहाजीराव दिनकरराव गायकवाड
पुणे गणेशखिंड शहर मंडल


श्री. सुनील महादेव माने
सोलापूर मंडल


श्री. गणपत माणिकराव लटपटे
कोल्हापूर परिमंडल


श्री. दीपक सबाजी लहामगे
बारामती मंडल


श्री. बाळासाहेब भागवत हाळनोर
सातारा मंडल


श्रीमती दीपाली धनंजय माडेलवार
पायाभूत आराखडा
अमरावती परिमंडल


श्री. वैभवकुमार धनीरामजी पाथोडे
रत्नागिरी मंडल


श्री. अमित विजय कुलकर्णी
पुणे प्रादेशिक विभाग
चाचणी व गुणवत्ता


श्रीमती प्रतीक्षा अजय शंभरकर
अकोला मंडल


श्री. संदीप दत्तात्रय दरवडे
छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडल


श्री. रमेशकुमार सीताराम पवार
अहमदनगर मंडल


श्री. सुनील रामचंद्र यादव
पायाभूत आराखडा
भांडूप शहर परिमंडल


श्री. संजय मनोहरराव वाकडे
पायाभूत आराखडा
नागपूर परिमंडल


श्री. कैलास कवडू दुधबर्वे
प्रादेशिक संचालक कार्यालय
कोकण प्रादेशिक विभाग


श्रीमती स्मिता मनोज पारखी
वर्धा मंडल


श्री. रूपेश कैलासराव टेंभुर्णे
परभणी मंडल


श्री. धनंजय किसन मोहोड
एचव्हीडीएस
सांघिक कार्यालय


श्रीमती सलोनी सुरेश वाकोडे
आयपीडीएस
सांघिक कार्यालय


श्री. संदीप विजयकुमार देशपांडे
देयके व महसूल
सांघिक कार्यालय


श्री. अमित अविनाश बोकील
सामुग्री विनिर्देश कक्ष
सांघिक कार्यालय


श्री. विनय सुदर्शन सिंह
वाणिज्य कक्ष
सांघिक कार्यालय


श्री. संजय बापू वाघमारे
नवीकरणीय ऊर्जा विभाग
सांघिक कार्यालय

अभिनंदन....!


श्रीमती शैलजा रविंद्र सावंत
मुख्य महाव्यवस्थापक
(वित्त व लेखा),
वित्त विभाग, सांघिक कार्यालय

बदली व पदस्थापना

अधिकारी यांचे नाव व पदनाम	यापूर्वीचे ठिकाण	पदस्थापना ठिकाण
श्री. अंकुश कोंडीबा नाळे मुख्य अभियंता	प्रादेशिक कार्यालय पुणे	बारामती परिमंडल
श्री. प्रवीण प्रतापसिंग परदेशी मुख्य अभियंता	वितरण व देखभाल कक्ष सांघिक कार्या.	सामुग्री व्यवस्थापन कक्ष सांघिक कार्यालय
श्री. अनिल नागेंद्र कालेकर मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा)	वित्त विभाग सांघिक कार्यालय	लेखा विभाग सांघिक कार्यालय

राजोली फिडरचा बिघाड दुरूस्तीसाठी मेहनत

गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील ३३/११ के.व्ही. केशोरी उपकेंद्रामधून निघणाऱ्या ११ के.व्ही. राजोली फिडरमधील बिघाड शोध व दुरूस्तीसाठी वीज कर्मचाऱ्यांनी अंधार व पावसात अहोरात्र मेहनत घेऊन २५ गावांचा बाधित वीजपुरवठा पुर्ववत केला. या मोहिमेत सहाय्यक अभियंता श्री.प्रदीप राऊत, जनमित्र सर्वश्री दिलीप शहारे,आशिष डोंगरावर, अजय बट्टी, विनोद मडावी, गुणवंत नेवरे, देवेंद्र गिबाडे, जुल्फी सय्यद यांनी कामकाज केले.

संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांचे नागपुरातील आढावा बैठकीत

विद्युत वाहिनी विलगीकरणाची कामे त्वरित मार्गी लावण्याचे निर्देश



▸▸ वाहिनी विलगीकरण योजनेतील कामांच्या आढावा बैठक प्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे .

आरडीएसएस योजनेतून सुरू असलेल्या विद्युत वाहिनी विलगीकरणच्या कामांना गती देण्याचे निर्देश संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांनी नागपूरातील आढावा बैठकीत दिले. यावेळी मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके यांच्यासह प्रादेशिक कार्यालय व नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, अमरावती या परिमंडलातील पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंते उपस्थित होते.

या बैठकीत श्री. रेशमे यांनी सर्वेक्षणानुसार वन विभाग, राष्ट्रीय व राज्य महामार्ग, रेल्वे आणि समृद्धी महामार्ग यांच्याकडून आवश्यक असलेल्या प्राप्त व प्रलंबित परवानग्यांची विस्तृत माहिती घेतली. प्रलंबित परवानग्या लवकर मिळवून वाहिनी विलगीकरणाची कामे त्वरित पुर्ण करून विलगीकरणाची कामे पुर्ण झाल्यास १५ दिवसांत या वाहिन्या सुरू करण्याचे निर्देश संचालक (प्रकल्प) यांनी दिले. या बैठकीला अधीक्षक अभियंते सर्वश्री राजेश नाईक, मंगेश वैद्य, संजय वाकडे, भिमराव हिवरकर, दीपाली माडेलवार, रमेश सानप यांचेसह कंत्राटदार एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते. ■

शांता शेळके यांनी बिबट्याला प्रसंगावधानाने केले जेरबंद



▸▸ वरिष्ठ तंत्रज्ञ शांता शेळके यांचा मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या हस्ते सत्कार

पुणे परिमंडल अंतर्गत चांडोली (ता. राजगुरूनगर) येथे महावितरणच्या मीटर चाचणी कक्षात शिरलेल्या बिबट्याला प्रसंगावधाने वरिष्ठ तंत्रज्ञ शांता शेळके यांनी जेरबंद केले. या कामगिरीसाठी मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी त्यांचा सत्कार केला.

याबाबत माहिती अशी, की चांडोली (ता. राजगुरुनगर) येथे एकाच परिसरात महावितरणचे राजगुरुनगर उपविभाग कार्यालय, दोन शाखा कार्यालय, मीटर चाचणी कक्ष व भांडार कक्ष आहे. एकाच खोलीत असलेल्या मीटर चाचणी कक्षामध्ये वरिष्ठ तंत्रज्ञ शांता शेळके मीटर चाचणीचा अहवाल तयार करीत होत्या. सकाळच्या वेळेत मीटर चाचणी कक्षाच्या दरवाजातून बिबट्याने प्रवेश केला. मात्र दरवाजासमोरच टेबलवर अहवाल लिहण्याचे काम करीत असलेल्या शेळके यांचे त्याकडे लक्ष गेले नाही. त्याचवेळी बाहेरून एका कर्मचाऱ्याचा 'वाघ आला' अशी अस्पष्ट आरोळी त्यांनी ऐकली. त्यानंतर दुसऱ्याच क्षणाला टेबलच्या बाजूला मिटर बॉक्सचा आवाज झाला. त्याकडे शेळके यांनी पाहिले असता बिबट्याचे दर्शन झाले. मात्र अत्यंत धैर्याने व प्रसंगावधान राखून शांता शेळके यांनी हळूच दरवाजा गाठला व बाहेरून बंद केला. त्यानंतर पोलीस व वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी आले व त्यांनी बिबट्याला बेशुद्ध करून जेरबंद केले. ■

थॅलॅसिमिया रुग्णांकरिता ६३ कर्मचाऱ्याचे रक्तदान

भारतीय मजदूर संघाच्या ६९ व्या वर्धापनदिनानिमित्त महाराष्ट्र वीज कामगार महासंघातर्फे थॅलॅसिमिया व सिकलसेलग्रस्त मुलांकरिता आयोजित रक्तदान शिबिरात छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील ६३ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन सहव्यवस्थापकीय संचालक श्री.राहुल गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट, महामंत्री श्री.अरुण पिवळ, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता श्री.रमेश वाघचौरे, जनसंपर्क अधिकारी श्री.ज्ञानेश्वर आर्दड, सर्वश्री बाबुराव शिंदे, तुषार भोसले, ज्ञानेश्वर हातकंगणे, दादाराव वाघमोडे, वाल्मीक निकम, धनंजय वझूरकर, अण्णा ताठे, संतोष सुरडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. औरंगाबाद थॅलेसिमिया सोसायटीचे सत्य साई रक्त केंद्र थॅलॅसिमिया रुग्णांसाठी मोफत रक्त देऊन उपचार करणारी नामांकित संस्था आहे. या केंद्राचे वैद्यकीय संचालक डॉ. श्री. महेंद्रसिंह चौहान व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सर्वश्री विजय मेटे, अनिल नरोडे, अर्शद खान, नीलेश पवार, अशोक कचकुरे, कैलास शेळके, श्रीमती कविता तळेले यांनी परिश्रम घेतले. ■

Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार • उपसंपादक : श्री. किशोर खोबरे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)